RNI No. MAHBIL/2009/35827

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ७, अंक ४२] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २१-२७, २०२१/आश्विन २९-कार्तिक ५, शके १९४३ [पृष्ठे १६, किंमत : रुपये १५.००

प्राधिकृत प्रकाशन

संकीर्ण सूचना व जाहिराती

शहर औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

क्र. सिडको/नियोजन/बी एन - १२२४३

सूचना

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (महा. XXXVII १९६६ चा) (या पुढे ‘उक्त अधिनियम’ असे संबोधिलेले) च्या कलम ११३, उप कलम (३क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाच्या दिनांक २० मार्च १९७१ रोजीची अधिसूचना क्र. आरपीबी ११७१/१८१२४/११३/११-डब्ल्यु आणि दिनांक १६ ऑगस्ट १९७३ रोजीची अधिसूचना क्र. आरपीबी/११७३-आरपीसी द्वारे ‘नवी मुंबई’ प्रकल्पाच्या अधिसूचित क्षेत्राकरिता ‘शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित’ ला (महाराष्ट्र शासनाची स्वमालकीची आणि नियंत्रत कंपनी, यापुढे ‘महामंडळ’ म्हणून निर्देशित केलेले) ‘नवीन शहर विकास प्राधिकरण’ म्हणून घोषित केले ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास, सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक २७ सप्टेंबर १९७९ रोजीच्या **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** प्रसिद्ध झालेल्या दिनांक १८ ऑगस्ट १९७९ रोजीच्या अधिसूचना क्र. आरपीबी ११७५/६३५/बी-न.वि.५ द्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून नवी मुंबईच्या विकास आराखड्यास मंजुरी दिली ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या उप कलम २ मधील अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासनाने उक्त संमत विकास आराखड्यात वेळोवेळी फेरबदल मंजूर केलेले आहेत. शासनाने सदर विकास आराखड्यात शेवटचे फेरबदल दिनांक २८ जून २०२१ रोजीच्या अधिसूचना क्र. टीपीएस/१२१८/३७३३/प्र.क्र.-९४/२० नवि-१२ द्वारे मंजूर केले आहेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास, सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या अधिसूचना क्र. TPS/1217/UOR-/UOR-1/CR---102/17/UD-12 च्या अधिसूचने सोबत जोडलेल्या अनुसूची मध्ये नमूद केलेल्या उक्त जमिनी उक्त महामंडळाच्या अधिसूचीत क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या आहेत आणि त्या जमिनीसंदर्भात शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे ‘नवनगर विकास प्राधिकरण’ म्हणून असलेले कार्य संपुष्टात आणण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमाच्या कलम ४०(१) (ख) मधील तरतुदीनुसार व त्याअन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकारान्वये या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद उक्त वगळण्यात आलेल्या जमिनी करिता शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे ‘विशेष नियोजन प्राधिकरण’ म्हणून नेमणूक करण्यात आली आहे ;

आणि ज्या अर्थी, उक्त महामंडळाच्या खाली नमूद अनुसूची मध्ये नमूद उक्त वगळण्यात आलेल्या जमिनी करिता शहर व औद्योगिक विकास महामंडळाची ‘विशेष नियोजन प्राधिकरण’ म्हणून नेमणूक करण्यात आली असून त्या करिता प्रारूप विकास आराखडा उक्त अधिनियमाच्या कलम २३ मधील तरतुदी नुसार व तसेच उक्त अधिनियमांच्या कलम २४ च्या तरतुदी नुसार वरिष्ठ नियोजनकार (वि.आ.) यांची नेमणूक ‘नगररचना अधिकारी’ म्हणून करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव दिनांक ५ ऑगस्ट २०२१ रोजीच्या संचालक मंडळाच्या ६३१ च्या बैठकीतील ठराव क्र. १२४४३ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे ;

अनुसूची

शासन अधिसुचना क्र. टीपीएस-१२१७/अनु.सं. १/प्र.क्र.१०२/१७/नवि-१२

दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ सोबतचे जोडपत्र

जमिनीची यादी-फेज-१

अ.क्र.	गावांचे नाव	स.नं.
(१)	(२)	(३)
१	दिघे	२६०,२३१
२	उथन	१००,९९
३	टेटवली	१४६
४	रबाळे	११०
५	घनसोली	५२८
६	महापे	२०२अे
७	बोरीवली	९४
८	पाडेघर	१३/सी, १३०/३, २०अे/१, २०अे/२, २०डी/१, २०डी/२, २०डी/३, ४५बी/१, २३, ४५डी, ४५अे (पै.), ४५सी(पै.)
९	मानघर	६८,६७
१०	चिर्ले	(६अे,सी,डी) (वन)
११	जासई	११७(पै.) १२७(पै.), १३१(पै.), ४सी
१२	वहाळ	४२७/१(पै.), ४२८, ४२९, ४३०, ४३१ (१ ते ५), ४३२ (१ व २), ४३३ (१ व २), ४३४, ४३५, ४३६
१३	नागांव	वन वन
१४	चाणजे	किल्ला, ४०८, २३, २४, २५, २६
१५	म्हातीवली	१८
१६	करावे	१४३, १४४, १४५, १४६, १४७, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १५३,१५४, १५५, १५६, १५७, १५८, १५९, १६०, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १६७, १६८, १६९, १७०, १७१, १७२, १७३, १७४, १७५, १७६, १७७, २२१, २२२, २२३, २३० (नवीन सर्व्हे नं. २९०) २५६, २६४बी, २२४, २९७

टीप :- (१) "(पै)" सर्व्हे नं. चे भाग दर्शवितात.

(२) पैकीच्या सर्व्हे नं. च्या हद्दी जागेवर तपासणे आवश्यक आहे आणि प्रत्यक्ष आखणीच्या अधिन असतील.

(३) उक्त सर्व्हे नं. मधील रस्त्यामध्ये येणारे व सिडकोच्या वेगवेगळ्या इन्फ्रास्ट्रक्चर प्रस्तावाने बाधीत क्षेत्र, अविकसित क्षेत्राच्या व्याख्येतून वगळण्यात येत आहे.

(४) सदरची अधिसूचना ही शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर (कायदे व नियम) देखिल उपलब्ध आहे.

आता म्हणूनच, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या अधिसूचना क्र. TPS/1217/UOR-1/CR-102/17/UD-12 करिता प्रारूप विकास आराखडा उक्त अधिनियमांच्या कलम २३ मधील तरतुदीनुसार तयार करण्याकरिता उक्त अधिनियमांच्या कलम २३ उप कलम (१) अनुषंगाने **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसाच्या पेक्षा अधिक नसेल अशा कालावधित सामान्य जनतेकडून प्रस्तावाबाबतीत आक्षेप व सूचना मागविण्यासाठी सिडको महामंडळ सूचना प्रकाशित करीत आहे. या सूचनेसंबंधी आक्षेप व सूचना महामंडळाच्या वरिष्ठ नियोजनकार(वि.आ.), ४ था मजला, नियोजन विभाग, सिडको भवन, सि बी. डी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ यांच्याकडे पाठवाव्यात.

अधिसूचीतील जमीन दर्शविणारा नकाशा खाली नमूद कार्यालयातील फलकावर कार्यालयीन वेळेत बघण्यासाठी ठेवण्यात आला आहे.

१. सिडको महामंडळाच्या पंजीकृत कार्यालय, निर्मल, दुसरा मजला, नरिमन पॉईट, मुंबई ४०० ०२१.

२. मुख्य नियोजनकार (वि.आ.), नियोजन विभाग (वि.आ.), ४ था मजला, सिडको भवन, सीबीडी-बेलापुर, नवी मुंबई ४०० ६१४.

३. सहसंचालक, नगररचना व मुल्य निर्धारण विभाग, कोकण विभाग, ३रा मजला, कोंकण भवन, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई ४०० ६१४.

निर्मल, दुसरा मजला,
नरीमन पॉईंट, मुंबई,
दिनांक १७ सप्टेंबर २०२१.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,
रविकुमार,
मुख्य नियोजनकार (वि.आ.).

CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.

Notice

No. CIDCO/ Planning/ BN-12443

Whereas, the Government of Maharashtra in exercise of the powers conferred by sub-section (3a) of the Section 113 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") vide Notification by Urban Development, Public Health and Housing Department, No. RPB 1171/18124/113/II-W, dated the 20th March 1971, and No. RPB / 1173-II-RPC, dated the 16th August 1973, declared City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (company owned and controlled by the Government of Maharashtra and herein after referred to as "The Corporation") as the New Town Development Authority for the area comprised in the site of Navi Mumbai as specified therein.

And whereas, the Government of Maharashtra in the Urban Development and Public Health Department approved the Development Plan for Navi Mumbai in exercise of the powers conferred under Section 31 of the said Act vide Notification No. RPB 1175/635/B-UD-5, dated 18th August 1979, published in the Maharashtra Govt. Gazette dated 27th September 1979.

And whereas, in exercise of the powers conferred by Sub Section (2) of the Section 37 of the said Act, the Government of Maharashtra has sanctioned modifications to the said approved development plan from time to time. The last modification sanctioned by the State Government is vide Notification No. TPS-1218/3733/CR-94/20/UD-12 dated 28th June 2021.

And whereas, The Government of Maharashtra (GoM) in the Urban Development Department (UDD) vide its Notification No. TPS/1217/UOR-1/CR-102/17/UD-12 dated 31st October 2017, denotified some land pockets from the Navi Mumbai New Town Notified area, described in the Schedule of said notification as deleted lands, whereby CIDCO ceases to function as the New Town Development Authority (NTDA), and appointed CIDCO as the Special Planning Authority (SPA) u/s 40(1)(b) of the Maharashtra Regional & Town Planning (MR & TP) Act 1966.

And whereas, the Corporation considers it necessary to declare the Intention to prepare Draft Development Plan u/s 23 of the MR&TP Act,1966, for these lands in Navi Mumbai Project, where CIDCO is appointed as SPA. Also Senior Planner (Development Plan, Navi Mumbai) is to be appointed as Town Planning Officer (TPO) u/s 24 of the MR&TP Act,1966 to carry out the duties prescribed under the Act and has approved the proposal

vide Board Resolution No. 12443 dated 05th August 2021 for the land as specified in the Schedule;

Schedule

Accompaniment with the Government Notification No. TPS-1217/UOR-1/C.R.102/17/UD-12, Dated the 31st October 2017.

Phase-1 List of lands

Sr. No. (1)	Name of Village (2)	Survey Nos. (3)
1	Dighe	260, 231
2	Ilthan	100, 99
3	Tetavli	146
4	Rabale	110
5	Ghansoli	528
6	Mahape	202A
7	Borivali	94
8	Padeghar	13/C, 130/3, 20A/1, 20A/2, 20D/1, 20D/2, 20D/3, 45B/1, 23, 45D, 45A(P), 45C(P)
9	Manghar	68, 67
10	Chirle	(6A,C, D) (Forest)
11	Jasai	117(P), 127(P), 131(P), 4C
12	Vahal	427/1(P), 428, 429, 430, 431(1 to 5), 432 (1&2), 433(1&2), 434, 435, 436
13	Nagaon	Forest, Forest
14	Chanje	Killa, 408, 23, 24, 25, 26
15	Mhativali	18
16	Karave	143, 144, 145, 146, 147, 148, 149, 150, 151, 152, 153, 154, 155, 156, 157, 158, 159, 160, 161, 162, 163, 164, 165, 166, 167, 168, 169, 170, 171, 172, 173, 174, 175, 176, 177, 221, 222, 223, 230 (New Survey No.290), 256, 264B, 224, 297

Notes. — (*1*) "(P)" indicates part Survey Numbers.

(2) Boundary of survey numbers mentioned as Part needs to be verified by site and it is subjectto demarcation.

(3) Area falling under roads and various infrastructure proposals of CIDCO if any, in theabove Survey numbers is to be excluded from identification as undevelopable.

In pursuance of. Sub-Section (1) of the Section 23 of the said Act, the Corporation herewith invites objections and suggestions from any person with respect to the said proposal of CIDCO for preparation of Development Plan for the listed lands published in the Notification of Govt. Of Maharashtra vide No. TPS/1217/UOR-1/CR-102/17/UD-12 dated 31st October 2017 not later than 60 days from the date of the publication of this Notice in the Maharashtra Govt. Gazatte. The objections and suggestions shall reach the office of Senior Planner (Development Plan) of the Corporation having his office at 4th Floor, CIDCO Bhavan, CBD-Belapur, Navi Mumbai-400 614.

A plan and the list of lands showing the boundary of the SPA-CIDCO, Navi Mumbai is kept open for inspection during office hours at:

(i) Registered office of the corporation, 2nd Floor, Nirmal, Nariman Point, Mumbai 400021

(ii) Office of Chief Planner (DP), 4th Floor, CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400614

(iii) Office of Joint Director of Town Planning, Konkan Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400614

By the order of Board of Directors of the Corporation

Dated 17th September 2021.
Regd. Office : Nirmal, 2nd Floor,
Nariman Point, Mumbai 400 021.

RAVI KUMAR,
Chief Planner (DP).

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

प्रस्तावित योजनांची अधिसूचना

Ref. No. MSETCL/CO/PS/Scheme-I/RE ORC/PN/5991

विद्युत कायदा, २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/प्र.क्र.३१२/ऊर्जा/४, दिनांक २४ ऑगस्ट २००६ (**शासकीय राजपत्र,** पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनेचे डी. डी. एफ. अंतर्गत काम हाती घेण्याचे प्रस्तावित करीत आहे. या सर्व अधिकारांचा वापर प्रस्तावित योजनेतील विजेचे पारेषण, वितरण अगर म.रा.वि. पारेषण कं. मर्या. च्या समन्वय, संचलन व सुव्यवस्था या कामाकरिता पारेषण कंपनीद्वारे करण्यात येईल. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

२. खालील योजना त्या भागातील अति उच्च दाब ग्राहकांच्या वाढत्या विजेची गरज पुरविण्यासाठी व नविन ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी, तसेच विद्युत पुरवठा तसेच विद्युत प्रणाली सक्षम करण्यासाठी आहे.

(१) ठाणे जिल्ह्यातील महापे, नवी मुंबई येथे मे. नेटमॅजिक आय.टि.सर्व्हिस प्रा. लि. यांना २२० के.व्ही. क्षमतेवर २५ मे. वॅट (९० मे वॅट पैकी) विद्युत पुरवठा करणेबाबत. (अ) जी.आय.एस. कंट्रोल रूम (३४.९ × १२मी) सहित २२० के.व्ही.जी.आय.एस. उपकेंद्राची उभारणी मे. नेटमॅजिक आय.टी.सर्व्हिस प्रा. लि. यांच्या जागेत उभारणी करणे. (*i*) २२० के.व्ही.जी.आय.एस. वाहिनी बे - २ बे (*ii*) २२० के.व्ही.जी.आय.एस. मीटरींग बे - २ नं. (एन.ई.आर.सी. मिटरींग कोड २०१९ अन्वये मेन व चेक मीटर सहित) (*iii*) २२० के.व्ही.जी.आय.एस. बस कपलर बे - १ नं. (*iv*) २२० के.व्ही.जी.आय.एस.बस पीटी-२ सेट (*v*) २२० व्होल्ट बॅटरी व बॅटरी चार्जर (*vi*) ओ.पी.जी.डल्बू–१५ कि.मी. व एफ.ओ.टी.ई. उपकरणे–२ नं. (१ नं. बोरीवली उपकेंद्रात व १ नं. नेटमॅजिक उपकेंद्रात) (*vii*) बस बार प्रोटेक्शन (ब) २२० के.व्ही. खारघर–बोरीवली द्विपथ वाहिनीच्या एका पथावर मे. नेटमॅजिक आय टी सर्व्हिस प्रा. लि. उपकेंद्रापर्यंत २२० के.व्ही खारघर–बोरीवली (५२५ स्वेअर मी. मी. ए.ए.ए.सी ट्वीन कन्डक्टर) सारखी क्षमता असणारी भूमिगत केबल (२५०० स्वेअर मी.मी.) ने द्विपथ लिलो वाहिनी उभारणे –०.३५ कि.मी. अंदाजे (क) एबीटी मोजणी व इतर संलग्न उपकरणे उभारणे. (ड) स्काडा प्रणाली उभारणे. या योजनेचा अंदाजे खर्च रु. ५४४४.१३ लाख इतका आहे.

३. परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असल्यास, ही सूचना प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती अधीक्षक अभियंता (योजना-I), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी-१९, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

मुंबई,
दिनांक ८ ऑक्टोबर २०२१.

नसीर कादरी,
संचालक (प्रकल्प).

वसई-विरार शहर महानगरपालिका

सूचना

क्रमांक व. वि. श. म./न. र./शा. १०१६/२०२१-२२

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ३७ अन्वये)

ज्याअर्थी, शासनाने नगरविकास विभाग अधिसूचना क्रमांक टी. पी. एस. १२०१/१५४८/ सी. आर. २३४ (सी), दिनांक ९ फेब्रुवारी २००७ अन्वये वसई-विरार उप प्रदेशाची विकास योजना भागशः मंजूर केली असून ती दिनांक १५ मार्च २००७ पासून अंमलात आलेली आहे. तसेच शासन निर्णय, नगरविकास विभाग क्रमांक २३०६/४१२/प्र.क्र./२२३/२००६/युडी-२४, दिनांक ३ जुलै २००९ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वात आलेली असून नगरविकास विभाग निर्णय क्र. टी.पी.एस. १२०९/२४२९/सी.आर. २६२/युडी-१२, दिनांक ७ जुलै २०१० नुसार या महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार प्रदान केलेले आहे. तसेच शासनाने वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतून वगळलेल्या २१ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोकडे असलेले अधिकार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१५ पासून वसई-विरार शहर महानगरपालिकेला प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, वसई-विरार शहर महानगरपालिकेने वसई-विरार उप प्रदेशाच्या विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) मधिल तरतुदीनूसार खालीलप्रमाणे सुधारणा करणेचे ठरविलेले आहे. वरील तरतुदी अनुसार मा. आयुक्त (सध्या प्रशासक म्हणून कारभार संभाळणारे) यांनी विकास आराखड्यामध्ये मौजे-धोवली, स.नं. १०४/B, १०४/A/२ व मौजे-सांडोर, स.नं. २९३ येथील २० मी. डी. पी रोड आरक्षण वगळून नवीन १८ मी. डी. पी रोड प्रस्तावित करण्यांस मान्यता दिलेली आहे :—

वगळण्यात येणाऱ्या आरक्षणाची माहिती खालीलप्रमाणे आहे :—

(१) डि. पी. रोड : २० मी. डी. पी. रोड

(२) डि. पी. आरक्षण क्षेत्र : १६००.०० चौ.मी.

(३) स्थळ अहवाल : मौजे-धोवली, स.नं. १०४/B, १०४/A/२ व मौजे-सांडोर, स.नं. २९३

(४) जमीन मालक : श्री. रमेश गुजर, श्री. अविनाश गुजर व ग्रामपंचायत सांडोर

प्रस्तावित करण्यांत येणाऱ्या आरक्षणाची माहिती खालीलप्रमाणे आहे :—

(१) डि. पी. रोड : १८ मी. डी. पी. रोड

(२) डि. पी. आरक्षण क्षेत्र : ३८६६.०० चौ.मी.

(३) स्थळ अहवाल : मौजे-धोवली, स.नं. ३/१ व स.नं. १०४/B

(४) जमीन मालक : श्री. रमेश गुजर, श्री. अविनाश गुजर व श्री. सौरभ गुजर.

संबंधित माहिती वसई-विरार महानगरपालिकेच्या नगररचनेच्या सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) च्या तरतुदीनुसार वसई-विरार उप प्रदेशाचे विकास योजनेत करावयाच्या उक्त सुधारणे बाबत नागरिकांच्या काही हरकती व सूचना असतील तर त्या त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र राज्य शासन राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या मुदतीत उप संचालक, नगररचना विभाग, तिसरा मजला, वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे लेखी स्वरुपात किंवा mail at *ddtpvvcmc2020@gmail.com* वर पाठविल्यास त्यांचा विचार विकास योजनेमधील सुधारणा/फेरफार मंजुरीसाठी शासनाकडे सादर करणेपूर्वी करणेत येईल.

वसई-विरार शहर महानगरपालिका,
नगररचना विभाग, मुख्यालय, तिसरा माळा,
बाजार वॉर्ड, विरार (पू.),
दिनांक १४ ऑक्टोबर २०२१.

गंगाथरन डी.,
आयुक्त,
वसई-विरार शहर महानगरपालिका.

चाळीसगाव नगरपरिषद, चाळीसगाव, जि. जळगाव

आदेश

क्रमांक बांध/२०१०/२०२१

ज्याअर्थी, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण भाग ४, दिनांक १३ मार्च २०१२ मध्ये प्रसिद्ध केल्यानुसार सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मध्ये दुरूस्ती करण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२ मध्ये अंमलबजावणीसाठी व अनधिकृत बांधकामांवर प्रभावी नियंत्रण आणणेसाठी मुख्याधिकारी यांनी नगरपरिषदेच्या बाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२ (३) नुसार संबंधीत अधिकाऱ्यास त्याच कार्यक्षेत्राकरिता “पदनिर्देशित अधिकारी” व “सहायक पदनिर्देशित अधिकारी” म्हणून अधिसूचित करणेची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५२ (३) मधील तरतुदीनुसार नगरपरिषद मुख्याधिकारी म्हणून मला प्राप्त झालेल्या अधिकारात मी, चाळीसगाव नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रासाठी चाळीसगाव नगरपरिषदेत कार्यरत असलेले नगरपरिषद अभियंता श्री. प्रदीप सुरेश धनके यांना अनधिकृत बांधकामांवर प्रभावी नियंत्रण आणणेसाठी व अधिनियमातील कलम ५५ व ५६ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी “पदनिर्देशित अधिकारी” म्हणून घोषित करीत आहे. तसेच (१) श्री. संजय भिकनसिंग राजपूत, (२) श्री. भूषण शाहू लाटे यांना “सहायक पदनिर्देशित अधिकारी” म्हणून घोषित करीत आहे.

प्रशांत डोंबरे,
मुख्याधिकारी,
चाळीसगाव नगरपरिषद, चाळीसगाव.

चाळीसगाव,
दिनांक १३ ऑक्टोबर २०२१.

BAR COUNCIL OF MAHARASHTRA AND GOA

No. BCMG/ACCT/13945/2021

State Lawyers Conference BCMG NASHIK 2020
Receipts and Payments A/c for the period ended 30-06-2020
1-Apr-2019 to 30-June-2020

Receipts	Amount (Rs)	Payments	Amount (Rs)
To Opening Balance		By Advertisement expenses	1,12,500
To Advertisment Receipts	30,10,111	By Bank charges	840
To Delegate Receipts	19,04,300	By Catering expenses	21,20,000
To Donation Receipts	9,70,700	By Trophy and bags	7,20,600
To Receipts (Membership & Reception Comittee)	2,37,000	By Lodging & Boarding Expenses	14,39,093
To Receipts from Patron	14,81,000	By Miscellaneous expenses	2,47,182
To Receipt from Bar Council of Maharashtra	7,00,000	By Mandap Expenses	14,50,000
		By Photography expenses	2,32,500
		By Postage and courier	9,250
		By Printing & Stationery Expenses	15,57,273
		By Travelling Expenses	1,32,541
		By Entertainment Programme	1,10,000
		By Nivedak	20,000
		By Snacks	1,50,000
		By Closing Balance	
		Samarth Bank	1,332
		Cash Balance	-
	83,03,111		83,03,111

For State Lawyer Conference BCMG, Nashik 2020.

AVINASH J. BHIDE,
Advocate,
Chairman.

NITIN B. THAKARE,
Advocate,
Co-ordinator.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

क्रमांक कडोंमपा/नरवि/४४३१

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये)

सूचना

ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने निर्णय क्रमांक टीपीएस/१२९९/१९१०/सीआर-३४/२०००/नवि. १२, दिनांक ३ सप्टेंबर २००५ व शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस १२०७/६०४/प्र.क्र. ४९४/०८/नवि-१२, दिनांक १४ सप्टेंबर २००९ नुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सेक्टर १ ची विकास योजना मंजूर केली आहे.

ज्याअर्थी, महापालिकेच्या स्मार्ट कल्याण-डोंबिवली डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड (SKDCL) मार्फत प्रस्तावित कल्याण स्टेशन सुधारणा प्रकल्पाअंतर्गत प्रस्तावित उड्डानपूल अनुषंगाने नवीन प्रस्तावित रस्ता मंजुर करून मिळणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट कल्याण- डोंबिवली डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड (SKDCL) यांनी दिनांक ४ फेब्रुवारी २०२१ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुसार प्रस्तावित कल्याण स्टेशन सुधारणा प्रकल्पाअंतर्गत प्रस्तावित उड्ड्‌ानपूल अनुषंगाने कल्याण बस स्थानकाच्या पश्चिम (मध्य रेल्वेकडील) बाजुचा १८ मी. रुंद रस्ता ते आरक्षण क्र. १३५ 'कल्याण नगर परिवहन' व आरक्षण क्र. १३६ ' दुकान केंद्र ' या आरक्षणांमधून १२.०० मी. रुंद प्रस्तावित विकास योजना रस्त्यापर्यंत ९.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये करावयाच्या फेरबदलाच्या कार्यवाहीस मा. आयुक्त तथा प्रशासक, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी दिनांक ७ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र. ५६ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे.

त्यानुसार फेरबदलाचा तपशिल दर्शविणारा भाग नकाशा व इतर तपशिल महापालिकेच्या सहाय्यक संचालक, नगररचना यांच्या कार्यालयात तसेच महापालिकेच्या ' क ' प्रभाग क्षेत्र कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत कामकाजाच्या दिवशी नागरीकांना पहाण्यासाठी उपलब्ध होईल.

त्याअर्थी, प्रस्तावित फेरबदलाबाबत ज्या नागरीकांना हरकती/सुचना द्यावयाच्या असतील त्यांनी लिखीत स्वरुपात ही सुचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसांच्या आत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागात सादर करण्यात यावीत. जेणेकरून सदर फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजुरीस सादर करण्यापूर्वी त्यावर विचार करण्यात येईल.

डॉ. विजय सूर्यवंशी,
आयुक्त तथा प्रशासक,
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

कल्याण,
दिनांक १४ ऑक्टोबर २०२१.

KALYAN-DOMBIVALI MUNICIPAL CORPORATION, KALYAN

NO.KDMC/TPS/4431

(As per section 37(1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)

Notice

Whereas, the Urban Development Department of Government of Maharashtra, *vide* Notification No.TPS-1299/1910/CR-34/2000/UD-12, Dated 3rd September, 2005 and modifiction No.TPS-1207/604/C.R.- 494/08/UD-12, Dated 14th September, 2009 has Sanctioned the Development plan for sector No. 1.

And Whereas, in view of Kalyan Station development Project, the Smart Kalyan-Dombivali Development Corporation Limited *Vide* letter dated 4th February 2021 have requested to propose new 9.00 Mtr wide road from the 18.0 mtr wide Development Plan road on west side of Kalyan Bus Station (Central railway side) upto 12.00 mtr wide Development Plan road (through the reservation No. 135 'Kalyan Municipal Transport'and reservation No. 136 'Shopping Center'). and Hon. Administrator of Kalyan-Dombivali Municipal Corporation has passed the Administrative Resolution No. 56, date 7th October 2021 to initiate the process of modification as mentioned above as per section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

In view of this the Part Plan showing the relevant Changes with the proposed modification is kept open for inspection of the General Public at the office of Town Planning Department and 'C' Ward Office of Kalyan-Dombivali Municipal Corporation on all working days in working hours.

Therefore, I hereby inform to citizens regarding suggestion/objection if any to the proposed modification should be communicated in writting to Assistant Director, Town Planning Department, Kalyan-Dombivali Municipal Corporation within 30 days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*, so that suggestion/objection so received will be considered before submitting the proposal for Sanction of the Government of Maharashtra.

Kalyan,
dated 14th October 2021.

DR. VIJAY SURYAVANSHI,
Administrator/Commissioner,
Kalyan-Dombivali Municipal Corporation.

पेण नगरपरिषद, पेण

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये)

सूचना

जा. क्रमांक पेनप/का.४/बांवि./२०२१/ १५८६

ज्याअर्थी, पेण शहराची मंजुर सुधारीत विकास योजना (दुसरी सुधारणा) शासन, नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस १७१५/२४८५/प्र.क्र.१५०/१५/एस.एम./नवि १२, दिनांक २३ मार्च २०१७ अन्वये (ई.पी. क्र. १ ते २५ वगळून) मंजुर केली असून ती दिनांक २३ मार्च २०१७ पासून अंमलात आलेली आहे. व उर्वरीत वगळलेल्या भाग (EP) ची मंजूरी दिनांक २९ जानेवारी २०१९ रोजी मंजूरी देणेत आली आहे.

मंजुर सुधारीत विकास योजनेत मौजे पेण स.नं. ८०, स.नं. ८१, स.नं. ८५, स.नं. ८६ मधील काही जागा ना-विकास क्षेत्रात दर्शविणेत आलेली आहे.

पेण नगरपरिषदेने सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४८१, दिनांक ७ सप्टेंबर २०२१ अन्वये मंजुर सुधारीत विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाद्वारे मौजे पेण स.नं. ८०, स.नं. ८१, स.नं. ८५, स.नं. ८६, मधील ना-विकास क्षेत्रातून वगळून ती रहीवास विभागात दर्शविणेचा निर्णय घेतला आहे.

त्याअर्थी, या फेरबदलाच्या अनुषंगाने कोणाचीही हरकत अगर सूचना असेल तर त्यांनी ती लेखी स्वरुपात निम्न स्वाक्षरीकार यांचे नांवे ही सूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत सादर करावी म्हणजे त्याचा विचार हा फेरबदल प्रस्ताव शासनाकडे पाठवितांना केला जाईल. या मुदतीनंतर आलेल्या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही.

वरील प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा भाग नाकाशा पेण नगरपरिषदेच्या कार्यालयामध्ये नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेत ठेवणेत आलेला आहे.

पेण,
दिनांक २० ऑक्टोबर २०२१.

प्रितम ललित पाटील,
अध्यक्ष,
पेण नगरपरिषद, पेण.

जीवन पाटील,
मुख्याधिकारी,
पेण नगरपरिषद, पेण.

PEN MUNICIPAL COUNCIL

(Under Section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)

Notice

No.PMC/DESK-4/WD/2021/1586

Whereas the Revised Development Plan (second revision) of Pen has been sanctioned by the Government of Maharashtra, Urban Development Department *vide* notification No.TPS-1715/2485/CR-150/15/S.M./UD-12, dated 23rd March 2017 and come into force with effect from 23rd March 2017 and other excluded part from Revised Development Plan (second revision) is sanctioned on date of 29th January 2021.

Whereas in the said Sanctioned Revised Development Plan in Mouje Pen Survery No. 80,81,85,86 some part is shown as No Development Zone.

Whereas the Pen Municipal Council *vide* resolution No. 481 dated 7th September 2021 has decided to delete Mouje Pen Survey No. 80,81,85,86 from No Development Zone and to include in Residential Zone by modification under section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Now therefore in pursuance of the sub-section (*1*) of section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Suggestions and objections if any, with reference to the above proposed modification are invited in writing from the public within one month from publication of this notice in the *Government Gazette* and these suggestions and objections would be considered by the Municipal Council at the time of submitting the proposed modification to the Government for sanction. Suggestions and objections are not received in the prescribed time limit will not be considered by Municipal Council.

Part Plan showing the proposed modification to the “said Development Plan” is kept open for the inspection of the public in the Municipal Council during the working day and working hours.

Pen,
dated 20th October 2021.

PRITAM LALIT PATIL,
President,
Pen Municipal Council, Pen.

JIVAN PATIL,
CEO,
Pen Municipal Council, Pen.

पेण नगरपरिषद, पेण

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये)

सूचना

क्रमांक पेनप/का.४/बांवि./२०२१/ १५८७

ज्याअर्थी, पेण शहराची मंजूर सुधारित विकास योजना (दुसरी सुधारणा) शासन, नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्रमाक टीपीएस-१७१५/२४८५/प्र.क्र.१५०/१५/एस.एम./नवि १२, दिनांक २३ मार्च २०१७ अन्वये (ई.पी. क्र. १ ते २५ वगळून) मंजूर केली असून ती दिनांक २३ मार्च २०१७ पासून अंमलात आलेली आहे व उर्वरीत वगळलेल्या भाग (EP) ची मंजुरी दिनांक २९ जानेवारी २०१९ रोजी मंजुरी देणेत आली आहे.

मंजूर सुधारित विकास योजनेत मौजे पेण स.नं. ३३६ मधील काही जागा ना-विकास क्षेत्रात दर्शविणेत आलेली आहे.

पेण नगरपरिषदेने सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४८१, दिनांक ७ सप्टेंबर २०२१ अन्वये मंजूर सुधारित विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाद्वारे मौजे पेण स.नं. ३३६ मधील ना-विकास क्षेत्रातून वगळून ती रहीवास विभागात दर्शविणेचा निर्णय घेतला आहे.

त्याअर्थी, या फेरबदलाच्या अनुषंगाने कोणाचीही हरकत अगर सूचना असेल तर त्यांनी ती लेखी स्वरुपात निम्न स्वाक्षरीकार यांचे नांवे ही सूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत सादर करावी म्हणजे त्याचा विचार हा फेरबदल प्रस्ताव शासनाकडे पाठविताना केला जाईल. या मुदतीनंतर आलेल्या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही.

वरील प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा पेण नगरपरिषदेच्या कार्यालयामध्ये नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेत ठेवणेत आलेला आहे.

पेण,
दिनांक २० ऑक्टोबर २०२१.

प्रितम ललित पाटील,
अध्यक्ष,
पेण नगरपरिषद, पेण.

जीवन पाटील,
मुख्याधिकारी,
पेण नगरपरिषद, पेण.

PEN MUNICIPAL COUNCIL

(Under Section 37(1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)

Notice

No. PMC/DESK-4/WD/2021/1587

Whereas, the Revised Development Plan (second revision) of Pen has been sanctioned by the Government of Maharashtra, Urban Development Department *vide* Notification No.TPS-1715/2485/CR-150/15/S.M./UD-12, dated 23rd March 2017 and come into force with effect from 23rd March 2017 and other excluded part from Revised Development Plan (second revision) is sanctioned on date of 29th January 2021.

Whereas in the said sanctioned Revised Development Plan in Mouje Pen Survey No. 336 some part is shown as No Development Zone.

Whereas the Pen Municipal Council *vide* resolution No. 481, dated 7th September 2021 has decided to delete Mouje Pen Survey No. 336 from No Development Zone and to include in Residential zone by modification under section 37 (*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Now therefore in pursuance of the sub-section (*1*) of section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, suggestions and objections if any, with reference to the above proposed modification are invited in writing from the public within one month from publication of this notice in the *Government Gazette* and these suggestions and objections would be considered by the Municipal Council at the time of submitting the proposed modification to the Government for sanction. Suggestions and objections are not received in the prescribed time limit will not be considered by Municipal Council.

Part Plan showing the proposed modification to the "said Development Plan" is kept open for the inspection of the public in the Municipal Council during the working day and working hours.

Pen,
dated 20th October 2021.

PRITAM LALIT PATIL,
President,
Pen Municipal Council, Pen.

JIVAN PATIL,
CEO,
Pen Municipal Council, Pen.

ON BEHA(LF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.